# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
Email: excise_jtcom_molasessalcohol@mahaonline.com, Tel no.०२२ २२६२०२३८

वाचले:- १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमआयएस ११२०१४/२४६२/५-ब, दि.१७.०७.२०१४
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एमआयएस ११२०१४/२४६२/५-ब, दि.१३.०३.२०१५

क्रमांक:- एमआयएस ११२०१४/२४६२/५-ब मुंबई, दि.३१ ऑक्टोबर,२०१५

## परिपत्रक

विषय :- भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) अन्वये मद्यांच्या बाटल्यावरील लेबलवर छापण्यात यावयाच्या मजकूराबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या समक्रमांकाच्या दि.१७.०७.२०१४ व दि.१३.०३.२०१५ च्या परिपत्रकान्वये भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) नवी दिल्ली यांच्या दि.३१.१०.२०१३ च्या अधिसुचनेन्वये देशात अन्न सुरक्षा कायदा लागू करण्यात आला असल्याने दि.०१.०१.२०१५ पासून मद्यांच्या बाटल्यांवर सदर अधिसुचनेतील निर्देशानुसार मजकूर छापणे बंधनकारक करण्यात आल्याचे कळविले होते. परंतु FSSAI प्राधिकरणाने दि. १६.१२.२०१४ च्या आदेशान्व्ये सदर मुदत दि.३०.०६.२०१५ पर्यंत वाढविली होती. तद्नंतर सदरची मुदत पुन्हा दि.०६.०८.२०१५ च्या आदेशान्वये दि.०४.०२.२०१६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता दि.०४.०२.२०१६ पर्यंत उत्पादित मद्य साठयावर जुना मजकूर असलेल्या लेबल्सचा वापर करता येईल व अशा प्रकारच्या जुन्या मजकूराच्या लेबलचा वापर करुन दि.०४.०२.२०१६ पर्यंत उत्पादित केलेला मद्य साठा दि.३१.०५.२०१६ पर्यंत वितरित करता येईल. मात्र, दि.०५.०२.२०१६ पासून लेबलवर FSSAI

सर्व अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीस्तव पाठवा
२७/११/१५

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक 1453
दिनांक 27.11.2015
विभाग

क्रमांक छापणे बंधनकारक असुन FSSAI प्राधिकरणाच्या तरतुदींचा कोणताही भंग होणार नाही याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.

(विजय सिंघल)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.

२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

३. सर्व पीएलएल/बीआरएल/सीएल-१ अनुज्ञप्तीधारक.

४. सर्व पीएलएल/बीआरएल/सीएल-१ अनुज्ञप्तीवरील प्रभारी अधिकारी.

५. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी

६. अभिलेख शाखा (५ प्रती. )

---

क्रमांक-एमआयएस-११२०१५/१४५३/स.आ/629 नाशिक दिनांक ३ डिसेंबर ~~नोव्हेंबर~~ २०१४

अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,नाशिक/जळगाव/धुळे/नंदुरबार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही साठी रवाना.

निर्गमित केले
जावक क्रमांक 629
दिनांक 3/12/2014
स्वाक्षरी

3/12/14

(प्रसाद प्र.सुर्वे)
विभागीय उपआयुक्त,
O/C राज्य उत्पादन शुल्क,नाशिक विभाग नाशिक.